पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २/८/२०१८

# वार्तापत्र

## शहिद पांडु आलाम सभागृहाचे उद्‌घाटन व शहिद चिन्ना वेंटा ट्राफीचे अनावरण कार्यक्रम

दिनांक ७ ऑगस्ट १९९७ रोजी मौजा खंडी (नैनवाडी) ता.भामरागड जि. गडचिरोली येथे नक्षलवादयांनी पेरुन ठेवलेल्या भुसुरुंगाच्या स्फोटात सी-६० पार्टी कंमाडर पांडु आलाम हे शहीद झाले होते. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ गडचिरोली पोलीस दलातर्फे पोलीस मुख्यालय, गडचिरोली परिसरात शहिद पांडु आलाम सभागृह उभारण्यात आले. सदर सभागृहाचे उद्‌घाटन मा.पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, श्री शैलेश बलकवडे, मा.अपर पोलीस अधिक्षक श्री महेंद्र पंडित, डॉ. हरी बालाजी यांच्या उपस्थितीत शहिद पांडु आलाम यांच्या पत्नी श्रीमती मनाबाई आलाम यांचे हस्ते आज रोजी पार पडले.

त्याचप्रमाणे मा.पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे संकल्पनेतुन सर्व पोस्टे/उपपोस्टे/पोमके तसेच सी-६० पथक यांच्या मध्ये संघभावना वाढीस लागावी म्हणुन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले असुन त्यातील विजेत्यांना शहिद चिन्ना वेंटा यांच्या नावाने ट्राफी व रोख पारितोषीक देण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. सदर ट्रॉफीचा अनावरण सोहळा शहिद चिन्ना वेंटा यांच्या पत्नी श्रीमती सुनिता वेंटा यांचे हस्ते नुकत्याच उदघाटन झालेल्या शहिद पांडु आलाम सभागृहात पार पडला.

तसेच दिनांक ३ मार्च २०१८ रोजी पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे घेण्यात आलेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड या कार्यक्रमाची स्मृती कायम स्मरणात राहावी या दृष्टीने पोलीस मुख्यालय, गडचिरोली परिसरात ‘‘गिनीज रेकार्ड स्टोन ’’ या नावाने स्मृती स्थळाची स्थापना करुन त्याचे उद्‌घाटन मा.पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख व नुतन पोलीस अधिक्षक श्री.शैलेश बलकवडे यांचे हस्ते करण्यात आले.

